# महात्मा फुले कृषि विद्यापीठ

राहुरी - ४१३ ७२२, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र)

## मे २०२५

# ई वार्ता




**LEGEND**

| | | |
|---|---|---|
| | Central Campus of MPKV | |
| | Agril. Research Station | 27 |
| | Post Graduate Institute | 01 |
| | Agril. Technology Information Centre | 01 |
| | Regional Extension Centre | 04 |
| | District Extension Centre | 05 |
| | Krishi Vigyan Kendra | 04 |
| | Agricultural Tech. School | 08 |
| | Agricultural Engg. College | 02 |
| | Agricultural College | 08 |
| | Horticulture College | 02 |
| | ABM College -1 | 01 |
| @ | Food Technology College - 1 | 01 |
| # | Agriculture Polytechnic College - 1 | 01 |

मफुकृवि विस्तार प्रकाशन क्र.२७८६/२०२५

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
मफुकृवि ई वार्ता
मे २०२५

## पाडेगाव ऊस संशोधन केंद्राला कृषिमंत्री मा. ना. ॲड. माणिकराव कोकाटे यांची भेट





**दि. २५ मे, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठांतर्गत पाडेगाव येथील मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्रात कृषिमंत्र्यांचा शेतकरी व शास्त्रज्ञांशी सुसंवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कृषिमंत्री मा. ना. ॲड. माणिकराव कोकाटे, पुणे येथील महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेचे उपाध्यक्ष श्री. तुषार पवार, कृषि परिषदेचे महासंचालक श्री. रावसाहेब भागडे, द्राक्ष बागायतदार संघ अध्यक्ष श्री. कैलास भोसले, प्रगतिशील शेतकरी श्री. दिलीपराव शिंदे, प्रगतशील शेतकरी श्री. मधुकर कोकाटे, संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, अधिष्ठाता डॉ. सातापा खरबडे, विद्यापीठ अभियंता इजी. मिलिंद ढोके, ऊस विशेषज्ञ डॉ. राजेंद्र भिलारे, सरपंच श्री. राहुल कोकरे उपस्थित होते.

याप्रसंगी कृषिमंत्री मा. ना. ॲड. माणिकराव कोकाटे मार्गदर्शन करतांना म्हणाले की ऊस उत्पादक शेतकऱ्यांची ऊसाची पंढरी समजल्या जाणाऱ्या पाडेगावच्या मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्राचे काम सर्वोत्कृष्ट आहे. या संशोधन केंद्राचे काम पूर्ण देशात प्रसारित असले तरी या केंद्राचे बळकटीकरण करून आंतरराष्ट्रीय स्तराचे केंद्र आपण बनविणार आहे. या संशोधन केंद्राला ९४ वर्षे पूर्ण झालेले असून त्याचे बळकटीकरण करणे गरजेचे आहे. या संशोधन केंद्रामध्ये शेतकरीभिमुख आंतरराष्ट्रीय दर्जाचे संशोधन व्हावे यासाठी मी या संशोधन केंद्राला नवी प्रशासकीय इमारत, शेतकरी निवास व प्रशिक्षण केंद्र, कर्मचारी निवासस्थान, टिशू कल्चर प्रयोगशाळा, कृत्रिम बुद्धिमत्ता प्रक्षेत्र कार्यालय उभारणीसाठी तत्वतः मान्यता देत आहे. या संशोधन केंद्राने उसाचे ८६०३२, फुले २६५, १५०१२, १५००६, १३००७ असे अनेक सरस वाण दिलेले आहेत. यापुढे या संशोधन केंद्राने कमी कालावधीचे व अधिक साखर उतारा देणारे वाण विकसित करावे. ऊस पिकात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून लागवड खर्च कसा कमी करता येईल व उत्पादन व उत्पन्न कसे वाढेल यावर भर देणे गरजेचे आहे. यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता प्रक्षेत्र स्थापन करावे. शेतीमध्ये दिवसेंदिवस मजुरांची कमतरता भासत आहे. यासाठी ऊस शेतीत यांत्रिकीकरणावर अधिक संशोधन होणे गरजेचे आहे. शासन शुगरकेन हार्वेस्टरसाठी शेतकरी उत्पादक कंपन्या व इतर गटांना ५० टक्के सबसिडी देत आहे. शेतकऱ्यांच्या मागणीनुसार कृषि विद्यापीठे आणि खाजगी कंपन्यांनी एकत्र येऊन ट्रॅक्टर ऑपरेटेड छोटे शुगरकेन हार्वेस्टर तयार करावे यामुळे अल्पभूधारक शेतकऱ्यांना फायदा होईल. शासनाचे नवीन कृषि धोरण, नवीन वाण शेतकऱ्यांपर्यंत लवकरात लवकर पोहोचण्यासाठी आपण गावपातळीवर डिस्प्ले बोर्ड लावून प्रचार व प्रसार करणार आहोत. जेणेकरून शेवटच्या शेतकऱ्यापर्यंत ही माहिती पोहोचेल. आपण शेतकऱ्यांसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने असे ॲप तयार करणार आहोत की ते शेतकऱ्यांना सांगेल कोणत्या पिकाची किती क्षेत्रावर लागवड झालेली आहे व आपण कोणते पीक घेतले पाहिजे. जेणेकरून मार्केटमध्ये आपल्या कृषि मालाला जास्त दर मिळेल. यामुळे पीक बदल पद्धतीलाही प्रोत्साहन मिळेल. शेतकऱ्यांना स्थानिक परिस्थितीवर आधारित हवामान सल्ला मिळावा यासाठी प्रत्येक गावात स्वयंचलित हवामान केंद्र स्थापन करणार आहोत. यामुळे शेतकऱ्यांना येणाऱ्या नैसर्गिक आपत्तीचा अंदाज आधीच कळेल व त्यामुळे होणारे नुकसान टळेल. शासन खंबीरपणे शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे आहे. यामुळे शेतकऱ्यांनी चिंता न करता आनंदाने शेती करावी. सन २०३२ साली पाडेगाव संशोधन केंद्रास १०० वर्ष पूर्ण होणार आहेत. त्यापूर्वी शेतकऱ्यांसाठी सुसज्ज, सर्व सोयीने परिपूर्ण असे पाडेगाव ऊस संशोधन केंद्र आंतरराष्ट्रीय स्तरावर नावलौकिक मिळविण्यासाठी सज्ज असेल असे प्रतिपादन त्यांनी केले .

याप्रसंगी इंजि. मिलिंद ढोके यांनी ऊस संशोधन केंद्र, पाडेगाव येथील प्रस्तावित इमारतींचा आराखडा सादर केला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत ऊस संशोधन केंद्राचे प्रमुख डॉ. राजेंद्र भिलारे यांनी केले. यावेळी त्यांनी ऊस संशोधन केंद्र स्थापनेपासून झालेल्या संशोधनाचा आढावा सादर केला. संशोधन केंद्राने विकसित केलेल्या उसाच्या वाणांखाली देशात ५६% क्षेत्र व राज्यात ८७% क्षेत्र आहे. ऊस

उत्पादक शेतकऱ्यांच्या उन्नतीमध्ये व साखर कारखान्यांच्या भरभराटीमध्ये ऊस संशोधन केंद्राचा सिंहाचा वाटा असल्याचे ते म्हणाले. याप्रसंगी शेतकरी श्री. गिरीश बनकर, श्री. सौरभ कोकीळ, श्री. कल्याण काटे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी शेतकरी म्हणाले की उसामध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेच्या संशोधनाला प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. व्हीएसआय प्रमाणे पाडेगाव संशोधन केंद्राला दर टनामागे एक रुपया दिला तर ऊस संशोधन केंद्रात होणाऱ्या संशोधनाला व संशोधन केंद्राच्या बळकटीकरणाला त्याचा फायदा होईल व तो फायदा अप्रत्यक्षपणे शेतकऱ्यांना होईल. ऊस संशोधन केंद्राचे बळकटीकरण झाल्यावर पाडेगावमध्ये ऊस पर्यटनाला मोठा वाव मिळेल. यामुळे तरुण शेतकरी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने शेती करतील. पाडेगाव येथील ऊस संशोधन केंद्र हे ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे दैवत आहे. खाजगी नर्सरीतून ऊस रोपांमध्ये होणारी भेसळ थांबविण्यासाठी ते क्वॉलिटी कंट्रोलच्या अंतर्गत आणणे गरजेचे आहे. याप्रसंगी उसावरील विविध प्रकाशनांचे विमोचन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या संवाद कार्यक्रमांमध्ये कृषि विभागाचे अधिकारी, परिसरातील प्रगतशील शेतकरी, शास्त्रज्ञ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार डॉ. दत्तात्रय थोरवे यांनी यांनी मानले.

## पिंपळगाव बसवंत येथे कृषिमंत्री मा.ना. ॲड. माणिकरावजी कोकाटे यांची भेट






**दि.२२ मे २०२५.** कृषिमंत्री मा.ना. ॲड. माणिकरावजी कोकाटे यांनी पिंपळगाव बसवंत येथे कांदा द्राक्ष संशोधन केंद्राला भेट देऊन द्राक्ष, कांदा व लसुण पिकावर होत असलेल्या संशोधनाचा आढावा घेतला. याप्रसंगी महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागायतदार संघाचे अध्यक्ष श्री. कैलास भोसले, कृषि मंत्र्यांचे मुख्य कार्य अधिकारी डॉ. सचिन हिरे, उपविभागीय कृषि अधिकारी श्री. जयंत गायकवाड, तालुका कषि अधिकारी श्री. सुधाकर पवार, श्री. माळोदे व द्राक्ष बागायतदार व संशोधन केंद्राचे शास्त्रज्ञ डॉ. मंगेश बडगुजर व डॉ. राकेश सोनवणे उपस्थित होते. यावेळी संशोधन केंद्राचे प्रभारी अधिकारी डॉ. रविंद्र पाटील यांनी महात्मा फुले कृषि विद्यापीठाने प्रसारित केलेल्या कांदयाच्या फुले समर्थ, बसवंत ७८०, फुले स्वामी, एन–२–४–१ व लसूणाच्या फुले बसवंत, फुले निलिमा या वाणांची वैशिष्टांसह माहिती कृषिमंत्री यांना दिली. ॲड. कोकाटे यांनी यावेळी द्राक्षाची रेसिडयु तपासणी प्रयोगशाळेसाठी जमिनीची पाहणी केली. त्यासोबतच ॲग्रोमॉल उभारणी करुन त्यादवारे विद्यापीठाने उत्पादित केलेले कांदा, सोयाबीन बियाणे, सुपर बायोमिक्स, द्रवरुप जीवाणू खते, जैविक कीडनाशके विक्री मोठया प्रमाणावर करण्याबाबत सुचित केले. तसेच द्राक्ष बागायतदार संघ व राष्ट्रीय द्राक्ष संशोधन योजना पुणे सोबत एकत्रितपणे काम करण्याच्या सुचना केल्या.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठाला आमदार श्री. राणाजगजीतसिंह पद्मसिंह पाटील यांनी भेट दिली

**दि. १७ मे, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाला महाराष्ट्र शासनाचे महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशनचे उपाध्यक्ष तथा आमदार श्री. राणाजगजीतसिंह पद्मसिंह पाटील यांनी भेट दिली. सदरची भेट ही महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली होती.

याप्रसंगी श्री. राणाजगजीतसिंह पद्मसिंह पाटील मार्गदर्शन करतांना म्हणाले की कृषिचे उत्पादन वाढीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा मोठा सहभाग असणार आहे. राहुरी कृषि विद्यापीठाने कृषिमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता, ड्रोन, रोबोटिक्स यावर मोठे काम केले आहे. या कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर मोठ्या प्रमाणावर व व्यापारी तत्त्वावर शेतकऱ्यांच्या शेतावर होणे आवश्यक आहे. भविष्यामध्ये कृषिचे उत्पादन व उत्पन्न वाढीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा मोठा वाटा असणार आहे. विद्यापीठातील विविध प्रकल्प व प्रयोगशाळेंना त्यांनी यावेळी भेटी दिल्या. यामध्ये विद्यापीठातील

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

मफुकृवि ई वार्ता

मे २०२५

वर्ष :५३, अंक क्रं. : ५३, मे, २०२५ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी





सेंटर ऑफ एक्सलन्स या प्रकल्पामध्ये त्यांनी कृषि फवारणी ड्रोन प्रयोगशाळा, हायपरस्पेक्ट्रल इमेजींग प्रयोगशाळा, रोबोटीक्स प्रयोगशाळा, फुले स्मार्ट हवामान केंद्र, ऑटो पी.आय.एस. सिंचन प्रणाली हे तंत्रज्ञान जाणून घेतले. त्यानंतर त्यांनी जैविक किड नियंत्रण प्रयोगशाळा, बेकरी प्रकल्प, कृषि अवजारे प्रकल्प, कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र व उद्यानविद्या विभागाच्या रोपवाटिकेला भेट दिली. या भेटीदरम्यान डॉ. सुनील कदम, डॉ. विक्रम कड, डॉ. तुळशीदास बास्टेवाड, डॉ. योगेश सैंदाणे, डॉ. भगवान देशमुख, डॉ. सचिन सदाफळ, प्रा. अन्सार अत्तार व डॉ. सचिन मगर यांनी माहिती दिली. सदर भेटीचे नियोजन जनसंपर्क अधिकारी डॉ. भगवान देशमुख यांनी केले.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठाला राज्याचे प्रधान सचिव (कृषि) श्री. विकास चंद्र रस्तोगी व प्रकल्प संचालक परिमल सिंह यांनी भेटी दिल्या





**दि. ६ मे, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठात राज्याचे प्रधान सचिव (कृषि) विकास चंद्र रस्तोगी व नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाचे प्रकल्प संचालक परिमल सिंह यांनी विविध प्रकल्पांना भेटी दिल्या. या भेटीनंतर आयोजीत करण्यात आलेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. शरद गडाख उपस्थित होते. याप्रसंगी अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे, संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, नियंत्रक श्री. सदाशिव पाटील, विद्यापीठ अभियंता श्री. मिलिंद ढोके, कृषि तंत्रज्ञान चे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रशांत बोडके व काष्टी, मालेगाव येथील कृषि विज्ञान संकुलाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सचिन नांदगुडे उपस्थित होते.

यावेळी विकास चंद्र रस्तोगी मार्गदर्शन करतांना म्हणाले की कृषि विद्यापीठाने त्यांच्या शैक्षणिक कार्यक्रमात कौशल्य आधारित विविध कोर्सेसचा आंतर्भाव केलेला आहे. या कौशल्य आधारीत कोर्सेसचा विद्यार्थ्यांना विविध कंपन्यांमध्ये रोजगार मिळविण्यासाठी किंवा स्वतःचा उद्योग सुरू करण्यासाठी मोठा फायदा होणार आहे. कृत्रिम बुध्दीमत्ता आणि रोबोटीक्स येणाऱ्या काळामध्ये कृषिचा चेहरा बदलणार आहे. कृषि विद्यापीठाने काटेकोर शेती आणि कृत्रिम बुध्दीमत्तेमध्ये चांगले काम केलेले आहे. कृषिमध्ये नविन गोष्टी शिकणे व शिकत राहणे

वर्ष :५३, अंक क्रं. : ५३, मे, २०२५ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

आत्ताची गरज आहे. नविन राष्ट्रीय शिक्षण धोरणानुसार कृषि विद्यापीठांना बहुविद्याशाखीय धोरण ठेवण्यासाठी ट्रॅडिशनल विद्यापीठांबरोबर सामंजस्य करार करावे.

अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना कुलगुरु डॉ. शरद गडाख म्हणाले की राहुरी कृषि विद्यापीठात संशोधन, शिक्षण व विस्तार शिक्षणाबरोबरच बिजोत्पादन निर्मितीचे उत्कृष्ट काम करीत आहे. विद्यापीठ बियाणे निर्मितीबरोबरच विविध प्रकारच्या दर्जेदार कृषि निविष्ठा तयार करत आहे. आगामी दोन महिन्यात विद्यापीठ संबंधित विभागाच्या शास्त्रज्ञांकडून कृषि तंत्रज्ञानावर आधारित तीन मिनिटांच्या क्लिप तयार करणार आहे. त्या विद्यापीठाच्या युट्युब चॅनेलवरून प्रसारित करण्यात येतील जेणेकरून विद्यापीठाचे तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्यास मदत होईल. कौशल्य आधारीत शिक्षणाद्वारे कृषि उद्योजक कसे तयार होतील याकडे विद्यापीठ प्रयत्नशील आहे. विद्यापीठाचे ५० वर्षेपुर्वीचे व स्वातंत्र्यपूर्व काळात स्थापन झालेले संशोधन केंद्रांचे बळकटीकरण करण्यासाठी मदत होण्याची अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली. श्री. परिमल सिंह यावेळी मार्गदर्शन करताना म्हणाले की विद्यापीठाचे तंत्रज्ञान जास्तीत जास्त शेतकऱ्यांपर्यत पोहचण्यासाठी पोकराचा विस्तार या कार्यक्रमाच्या माध्यमातून ते शक्य आहे. या कृषि विद्यापीठाने ए.आय., आय.ओ.टी., हायपरस्पेक्ट्रल इमेज मोठा डाटा तयार केला आहे. हा डाटा कृषिमध्ये ए.आय.च्या उपयोगासाठी फार महत्वाचा असून त्यासाठी विद्यापीठाने स्वतंत्र क्लाउड घेवून त्यावर तो संवर्धन करावा.

यावेळी डॉ. साताप्पा खरबडे यांनी शिक्षणाचा, डॉ. विठ्ठल शिर्के यांनी संशोधनाचा, डॉ. गोरक्ष ससाणे यांनी कृषि विस्तार शिक्षण उपक्रमाचा, डॉ. नितीन दाणवले यांनी बियाणे विभागाचा व प्रशासनाचा, श्री. सदाशिव पाटील यांनी वित्त विभागाचा आणि इंजि. मिलिंद ढोके यांनी बांधकामाचा आढावा सादर केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत डॉ. नितीन दानवले यांनी केले. या कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांनी विद्यापीठातील विविध प्रायोगिक प्रक्षेत्र तसेच प्रयोगशाळेंना भेटी दिल्या. यामध्ये ड्रोन प्रयोगशाळा, हायपरस्पेक्ट्रल इमेजींग प्रयोगशाळा, रोबोटीक्स प्रयोगशाळा, फुले स्मार्ट हवामान केंद्र, ऑटो पी.आय.एस. सिंचन प्रणाली, सेंटर ऑफ एक्सलन्स, कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र, काढणी पश्चात तंत्रज्ञान प्रयोगशाळा, जैविक कीड नियंत्रण प्रयोगशाळा, फळे व भाजीपाला बेकरी प्रक्रिया केंद्र, बियाणे विभाग, कोरडवाहू फळपिके प्रकल्प, भाजीपाला प्रकल्प, नर्सळी, प्रात्याक्षीक प्रक्षेत्र, धनवंतरी, जीन बँक, सेंदिय शेती संशोधन व प्रशिक्षण केंद्र, बांबू प्रकल्प, निवडुंग चारा प्रात्यक्षिक प्रकल्प, कृषि अवजारे प्रकल्प, जैविक खते प्रयोगशाळा व फुले कृषि वाहिनी ९०.८ एफ.एम. या प्रकल्पांना मान्यवरांनी भेटी दिल्या. या ठिकाणी संबंधित शास्त्रज्ञांनी प्रकल्पाबाबतची माहिती मान्यवरांना दिली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार डॉ. आनंद चवई यांनी मानले. यावेळी विद्यापीठातील सर्व विभाग प्रमुख, शास्त्रज्ञ, प्राध्यापक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे आठ वाण, तीन कृषि यंत्रे, आणि ६१ कृषि तंत्रज्ञान शिफारशींना मान्यता



संकरीत बाजरी - फुले मुक्ताई (डीएचबीएच -२१०७५)
Bajra Hybrid - Phule Muktai -21075 (DHBH 21075)




भेंडी - फुले गायत्री (आरएचआरओकेएच - ०१)
Okra - Phule Gayatri (RHROKH - 01)



फुले स्पेड नांगर तव्याच्या कुळवासहीत
Phule spade plough with disc harrow



भात - फुले मावळ - ८ (व्हिडीएन - २००३)
Rice - Phule Maval - 8 (VDN - 2003)




दुधी भोपळा - फुले अनमोल (आरएचआरबीजी - ३५)
Bottle Gourd - Phule Anmol (RHRBG - 35)
राष्ट्रीय स्तरावर शिफारशित




करडई - फुले करडई (एसएसएफ - ०७)
Safflower - Phule Safflower (SSF - 07)



फुले फळबाग तण कापणी यंत्र
Phule orchard grass cutter



कारळा - फुले कळसुबाई (आयजीपीएन - १८३४)
Niger - Phule Kalsubai (IGPN - 1834)



जांभूळ - फुले नीलकंठ (आरएचआरजे -७/१)
Jamun - Phule Nilkanth (RHRJ - 7/1)



गहू - फुले शाश्वत (एनआयएडब्ल्यू ४११४)
Wheat - Phule Shashwat (NIAW 4114)
राष्ट्रीय स्तरावर शिफारशित



मोसंबी - फुले रसिका (सिलेक्शन - ७)
Sweet Orange - Phule Rasika (Selection - 7)



फुले भुईमूग शेंगा तोडणी यंत्र
Phule groundnut stripper

**दि. ३१ मे, २०२५.** महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे आणि राज्यातील चारही कृषि विद्यापीठे यांच्या संयुक्त विद्यमाने वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी येथे तीन दिवसीय संयुक्त कृषि संशोधन आणि विकास समितीची ५३ वी बैठक संपन्न झाली. या

वर्ष :५३, अंक क्रं. : ५३, मे, २०२५ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

बैठकीच्या समारोपप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून राज्याचे कृषि मूल्य आयोगाचे अध्यक्ष श्री. पाश्या पटेल उपस्थित होते. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. इंद्र मणि होते. यावेळी व्यासपीठावर महात्मा फुले कृषि विद्यापीठ आणि पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख, कृषि परिषदेचे कार्यकारी परिषद सदस्य श्री. विनायक काशीद, श्री. जनार्दन कातकडे, महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, कृषि परिषदेचे संचालक संशोधन श्री. किशोर शिंदे, परभणी कृषि विद्यापीठाचे संचालक संशोधन डॉ. खिजर बेग, परभणी , अकोला कृषि विद्यापीठाचे संचालक संशोधन डॉ. विलास खर्चे, परभणीचे विस्तार शिक्षण संचालक डॉ. राकेश आहेर, शिक्षण संचालक डॉ. भगवान आसेवार उपस्थित होते.

यावेळी कुलगुरू डॉ. शरद गडाख बोलताना म्हणाले की महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या शास्त्रज्ञांच्या प्रयत्नांनी या वर्षी शेतकऱ्यासाठी विविध पिकांचे आठ वाण, तीन कृषि यंत्रे–अवजारे आणि ६१ कृषि तंत्रज्ञान शिफारशी प्रसारीत करण्यात आल्या आहे. या वाणांमुळे व तंत्रज्ञान शिफारशींमुळे पिकांची उत्पादकता वाढण्यास मदत होईल व नवीन यंत्र व अवजारांमुळे शेतकऱ्यांचे श्रम कमी होतील.

या बैठकीत महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे आठ वाण, तीन कृषि यंत्रे अवजारे, ६१ पीक उत्पादन तंत्रज्ञान शिफारशींना मान्यता देण्यात आली. यामध्ये संकरित बाजरी – फुले मुक्ताई, भात – फुले मावळ – ८, कारळा – फुले कळसुबाई, भेंडी – फुले गायत्री, दुधी भोपळा – फुले अनमोल, करडई – फुले करडई, जांभूळ – फुले नीलकंठ, मोसंबी – फुले रसिका हे वाण प्रसारीत करण्यात आले. तसेच फुले स्पेड नांगर तव्याच्या कुळवासहित, फुले फळबाग तण कापणी यंत्र व फुले भुईमूग शेंगा तोडणी यंत्र प्रसारीत करण्यात आले असल्याची माहिती महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के यांनी दिली.

### प्रसारीत वाण

**१. संकरित बाजरी – फुले मुक्ताई (डीएचबीएच २१०७५):** संकरित बाजरीचा हा फुले मुक्ताई वाण अधिक धान्य उत्पादन (३०.३६ क्वि. प्रति हेक्टर), लोहाचे प्रमाण ७५ पीपीएम आणि जस्त ४२ पीपीएमचे अधिक प्रमाण, घट्ट कणीस, टपोरे गोलाकार करड्या रंगाचे दाणे, गोसावी व करपा रोगास प्रतिकारक्षम असलेला हा वाण महाराष्ट्रात खरीप हंगामात लागवडीसाठी प्रसारित करण्यात आला.

**२. भात – फुले मावळ – ८ (व्हीडीएन– २००३):** फुले मावळ –८ हा तुल्यवान पवनापेक्षा २०% जास्त कर्जत ७ पेक्षा १४.७८% जास्त उत्पादन देणारा, लवकर येणारा, न लोळणारा, दाणे न गळणारा वाण मानेचा करपा, तपकिरी ठिपके, पानाचा करपा रोगास मध्यम प्रतिकारक्षम असलेला तसेच खोडकिडीस प्रतिकारक्षम असलेला वाण पश्चिम महाराष्ट्रात खरीप हंगामासाठी प्रसारित करण्यात आला.

**३. कारळा – फुले कळसुबाई (आयजीपीएन–१८३४):** कारळ्याचा फुले कळसुबाई हा तेलाचे अधिक प्रमाण, चमकदार काळे दाणे, बोंडांची अधिक संख्या तसेच भुरी, मूळ व खोडकुज रोगास सहनशील असलेला आणि अधिक उत्पादन देणारा वाण महाराष्ट्रात खरीप हंगामासाठी प्रसारित करण्यात आला.

**४. भेंडी–फुले गायत्री (आर.एच.आर. ओ.के.एच.–०१):** भेंडीचा फुले गायत्री (आर. एच. आर. ओ.के. एच. –०१) हा मध्यम आकाराची हिरवी फळे, येलो व्हेन मोझॅक, पांढरी माशी व फळ पोखरणाऱ्या अळीस मध्यम प्रतिकारक्षम असलेला आणि अधिक उत्पादन देणारा वाण महाराष्ट्रात लागवडीसाठी प्रसारित करण्यात आला.

**५. दुधी भोपळा – फुले अनमोल (आरएचआरबीजी ३५):** दुधी भोपळ्याचा फुले अनमोल हा वाण एकसारख्या दंडगोलाकार व हिरव्या रंगाची फळे असलेला, अधिक उत्पादन देणारा महाराष्ट्र राज्यासाठी प्रसारित करण्यात आला आहे.

**६. करडई – फुले करडई (एसएसएफएफ–०७):** करडईचा फुले करडई (एसएसएफएफ–०७) हा वाण हिरव्या पानाचे अधिक उत्पादन, अल्टरनेरिया रोगास आणि मावा किडीस मध्यम प्रतिकारक्षम असणारा पश्चिम महाराष्ट्रात पालेभाजीसाठी प्रसारित करण्यात आला.

**७. जांभूळ – फुले नीलकंठ (आरएचआरजे– ७/१):** जांभळाचा फुले नीलकंठ, (आरएचआरजे–७/१) हा वाण जास्त वजनाची व मोठ्या आकाराची फळे, गराचे जास्त प्रमाण व अधिक टिकवणक्षमता असलेला वाण महाराष्ट्रासाठी प्रसारित करण्यात आला.

**८. मोसंबी– फुले रसिका (सिलेक्शन नं. ७) :** मोसंबीचा फुले रसिका (सिलेक्शन नं. ७) हा रसाचे जास्त प्रमाण असणारा, क जीवनसत्वाचे अधिक प्रमाण असणारा वाण महाराष्ट्रात लागवडीसाठी प्रसारित करण्यात आला आहे.

### प्रसारीत यंत्रे

**१. फुले स्पेड नांगर तव्याच्या कुळवासहित:** मशागतीने पेरणी योग्य जमीन तयार करण्यासाठी उपयुक्त असलेला, मशागतीसाठी लागणाऱ्या खर्चात आणि वेळेत बचत करणारा तसेच पारंपारिक पद्धतीने खर्चामध्ये ४४% बचत करणारा हा फुले स्पेड नांगर प्रसारित करण्यात आला.

**२. फुले फळबाग तण कापणी यंत्र:** फळबागेमध्ये तण कापणीकरिता उपयुक्त, फळबागेतील दोन ओळीतील अंतरानुसार रुंदी समायोजित करता येणारे तसेच २४ आणि त्यापेक्षा जास्त अश्वशक्तीच्या ट्रॅक्टरसाठी उपयुक्त असलेले फुले फळबाग तण कापणी यंत्र प्रसारित करण्यात आले.

**३. फुले भुईमूग शेंगा तोडणी यंत्र:** भुईमुगाच्या वेलीपासून शेंगा तोडणी करिता उपयुक्त असलेले, लहान आणि सीमांत शेतकऱ्यांसाठी उपयुक्त तसेच एक अश्वशक्ति सिंगल फेज विद्युत मोटार चलित फुले भुईमूग शेंगा तोडणी यंत्र प्रसारित करण्यात आले.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात रब्बी आढावा व खरीप नियोजन २०२५ या बैठकीचे आयोजन



**दि. २३ मे, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठात रब्बी आढावा व खरीप नियोजन २०२५ या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी या बैठकीच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. शरद गडाख होते. याप्रसंगी संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे व बियाणे विभागाचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. नितीन दानवले उपस्थित होते.

यावेळी कुलगुरू डॉ. शरद गडाख अध्यक्षीय मार्गदर्शनात म्हणाले की महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असणाऱ्या विविध विभागांमार्फत बी–बियाणे, कलमे रोपे, जैविक खते व जैविक औषधे इ. निर्मिती केली जाते. या विभागांनी तयार केलेल्या या विविध कृषि निविष्ठांच्या विक्रीमुळे त्यांना आर्थिक फायदा होवून विद्यापीठ महसुलात भर पडते. याकरीता या विभागांनी जास्तीत जास्त निविष्ठा तयार कराव्यात जेणेकरुन या निविष्ठांच्या विक्रीतून संबंधीत विभाग आत्मनिर्भर होतील. या बैठकीमध्ये कुलगुरु डॉ. शरद गडाख यांनी विद्यापीठ कार्यक्षेत्रांतर्गत संशोधन केंद्रावरील रब्बी बीजोत्पादन, कलमे, रोपे, जैविक खते औषधे यांचा एकत्रित आढावा घेतला. यावेळी त्यांनी विद्यापीठाचे दर्जेदार उत्पादनाची शेतकऱ्यांना माहिती होण्यासाठी सर्वच संशोधन केंद्रांनी खरीप हंगामाच्या सुरुवातीलाच कार्यशाळा आयोजित करून जास्तीत जास्त शेतकऱ्यांपर्यंत विद्यापीठाचे आधुनिक शेती तंत्रज्ञानाची माहिती द्यावी अशी सूचना केली. या बैठकीमध्ये डॉ. नितीन दानवले यांनी सादरीकरण केले. यावेळी कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता, विविध विभागांचे विभाग प्रमुख, प्रमुख शास्त्रज्ञ, विद्यापीठ कार्यक्षेत्रातील सर्व बिजोत्पादक शास्त्रज्ञ तसेच राष्ट्रीय बियाणे महामंडळ, महाबीज यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात ६५ वा महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा

**दि. १ मे, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठात ६५ वा महाराष्ट्र दिन आणि कामगार दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे अधिष्ठाता (कृषि) डॉ. साताप्पा खरबडे यांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, कुलसचिव डॉ. नितीन दानवले, विद्यापीठ अभियंता श्री. मिलिंद ढोके व कृषि तंत्रज्ञानाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रशांत बोडके उपस्थित होते. विद्यापीठात झालेल्या ध्वजारोहणाच्या कार्यक्रमास विविध विभागांचे विभाग प्रमुख, अधिकारी, शास्त्रज्ञ, विद्यार्थी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरक्षा अधिकारी श्री. गोरक्षनाथ शेटे व एनसीसी अधिकारी डॉ. सुनील फुलसावंगे यांनी केले.

यावेळी मार्गदर्शन करतांना डॉ. साताप्पा खरबडे म्हणाले की विद्यापीठाने संशोधन, शिक्षण व विस्तार या तीनही क्षेत्रात दैदिप्यमान कामगिरी केली आहे. शेतकऱ्यांना उपयोगी ठरणाऱ्या १८६६ तंत्रज्ञान शिफारशी, विविध पिकांच्या ३११ वाणांची निर्मिती व ५१ कृषि अवजारे व यंत्रांची निर्मिती विद्यापीठाने केली आहे. आपल्या विद्यापीठाच्या ३८ व्या पदवीप्रदान समारंभात विद्यापीठाने एकूण ५,२०१ विद्यार्थ्यांना पदव्या प्रदान केल्या आहेत. राहुरी कृषि विद्यापीठाने विकसीत केलेल्या प्रमुख ८ पीकांच्या वाणांचे आर्थिक विश्लेषण केले असता या वाणामुळे





आजपर्यंत राज्याच्या अर्थव्यवस्थेमध्ये ढोबळमानाने एकुण रु. २,४०,१८८ कोटी व निव्वळ ३२,२०६ कोटी रुपये इतक्या महसुली उत्पन्नाची भर पडली आहे. राज्याच्या तसेच देशाच्या कृषि क्षेत्रात महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मोठे योगदान आहे.

## फुले सुपर बायोमिक्स या जैविक उत्पादनाच्या प्रयोगशाळेचे उद्घाटन





**दि. २२ मे, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील वनस्पती रोगशास्त्र व अणुजीवशास्त्र विभागामध्ये फुले सुपर बायोमिक्स या जैविक उत्पादनाच्या प्रयोगशाळेचे उद्घाटन कुलगुरू डॉ. शरद गडाख यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख होते. याप्रसंगी संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, कृषिभूषण श्री. सुरसिंग पवार, वनस्पती रोग शास्त्र व अणुजीवशास्त्र विभाग प्रमुख डॉ. अण्णासाहेब नवले, प्रमुख शास्त्रज्ञ बियाणे डॉ. नितीन दानवले व वनस्पती रोग शास्त्र व अनुजीवशास्त्र विभागाचे प्राध्यापक डॉ. संजय कोळसे उपस्थित होते.

याप्रसंगी कुलगुरू डॉ. शरद गडाख मार्गदर्शन करतांना म्हणाले की महात्मा फुले कृषि विद्यापीठ उत्पादीत फुले सुपर बायोमिक्स हे जैविक उत्पादन शेतकऱ्यांसाठी वरदान ठरणार आहे. या उत्पादनामुळे शेतकऱ्यांना कमी खर्चामध्ये अनेक प्रकारच्या किडी व रोगांपासून त्यांच्या पिकांचे संरक्षण करता येणार आहे. याचा जास्तीत जास्त शेतकरी बंधूंनी फायदा घ्यावा. यावर्षीच्या खरीप हंगामासाठी विद्यापीठाने ११ टन कांदा बियाणे उत्पादित केले आहे. याचबरोबर अन्य बियाण्यांचे बीजोत्पादन, रोपवाटिका,जीवाणू खते, जैविक कीडनाशके या

निविष्ठांच्या विक्रीतून विद्यापीठाचे महसुली उत्पन्न वाढत आहे. या महसुली उत्पन्नाचा उपयोग विद्यापीठ संशोधनासाठी करीत असून विद्यापीठात होत असलेले संशोधन शेतकऱ्यांसाठी उपयुक्त आहे. डॉ. विठ्ठल शिर्के मार्गदर्शन करताना म्हणाले की फुले सुपर बायोमिक्स या जैविक उत्पादनाच्या निर्मितीमुळे शेतकऱ्यांची अनेक दिवसांची असलेली मागणी पूर्ण झाली आहे. या जैविक उत्पादनामध्ये पाच प्रकारच्या जैविक बुरशी व सहा प्रकारचे जिवाणू एकत्रित केले आहेत. शेतकऱ्यांना खऱ्या अर्थाने फायदा होईल असे शेतकरीभिमुख संशोधन व उत्पादन निर्मितीचे महत्त्वाचे काम डॉ. अण्णासाहेब नवले व त्यांच्या टीमने केले आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना डॉ. अण्णासाहेब नवले म्हणाले की फुले सुपर बायोमिक्स हे अतिशय गुणकारी उत्पादन असून हवेतून व जमिनीतून होणाऱ्या रोगांवर अत्यंत प्रभावी आहे. हे उत्पादन शेतीसाठी मोठे वरदान ठरेल तसेच हे उत्पादन शेतकऱ्यांना निश्चितपणे उपयोगी पडणारे आहे असे त्यांनी यावेळी सांगितले. याप्रसंगी कृषिभुषण श्री. सुरसींग पवार यांनी आपले मनोगत व्यक्त केले. मान्यवरांच्या हस्ते पावडर व द्रव स्वरूपातील फुले सुपर बायोमिक्स या उत्पादनाचे लॉन्चिंग तर त्यासंबंधी माहिती असणाऱ्या माहितीपत्रकाचे विमोचन यावेळी करण्यात आले. याप्रसंगी प्रातिनिधिक स्वरूपात राहुरी येथील शेतकरी प्रतिनिधी श्री. मिनीनाथ तनपुरे यांना मान्यवरांच्या हस्ते जैविक उत्पादनांची किट देण्यात आली. या कार्यक्रमासाठी हळगाव कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. अनिल काळे, विद्यापीठातील विभाग प्रमुख, शास्त्रज्ञ, कर्मचारी व विद्यार्थी – विद्यार्थिनी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आनंद चवई यांनी तर आभार डॉ. संजय कोळसे यांनी मानले.

## सेंटर ऑफ एक्सलन्स या प्रकल्पामध्ये चर्चासत्र संपन्न



**दि. २३ मे, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे कार्यरत असलेल्या काटेकोर शेतीसाठी डिजिटल तंत्रज्ञानावर आधारित सेंटर ऑफ एक्सलन्स या प्रकल्पामध्ये चर्चासत्र आयोजीत करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे होते. या चर्चासत्रासाठी मार्गदर्शक म्हणुन संरक्षण निधी आणि गोड्या पाण्याच्या संस्थेचे पोस्ट डॉक्टरेट संशोधक डॉ. गजानन कोठावडे उपस्थित होते. यावेळी कृषि अभियांत्रिकी विभागाचे विभाग प्रमुख डॉ. सुनील कदम, कृषि वनस्पतीशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. विजू अमोलीक, प्रमुख शास्त्रज्ञ (बियाणे) डॉ. नितीन दानवले, कापूस पैदासकार डॉ. पवन कुलवाल व सेंद्रिय शेती प्रकल्पाचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. उल्हास सुर्वे उपस्थित होते.

यावेळी अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे म्हणाले की विद्यार्थी आणि प्राध्यापकांना कृषि संशोधन क्षेत्रातील विविध नवीन उपक्रम आणि शाश्वत विकासाचे नेतृत्व करण्यासाठी महत्त्वाची संधी आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराने शेतीमध्ये उत्पादन, उत्पादकता आणि भरभराट प्राप्त होऊ शकते. यावेळी डॉ. गजानन कोठावडे यांनी सूक्ष्म नोंदी घेणारे कृषिमधील आधुनिक उपकरणे या विषयावर व्याख्यान दिले. त्यांच्या व्याख्यानात त्यांनी वनस्पतीतील ताण, रोग व किडींचा प्रादुर्भाव, मृदेतील पोषक तत्वांचे घटक, पाण्याचे संतुलन यासारख्या न दिसणाऱ्या कृषि धोक्यांबद्दल स्पेक्टरल इमेजिंग, बायोसिंसेस, रिमोट सेन्सिंग, ऑप्टिकल सेन्सिंग साधने आणि आय.ओ.टी. इत्यादी कृषि क्षेत्रातील डिजिटल तंत्रज्ञानाबद्दल विद्यार्थी व शास्त्रज्ञांना सविस्तर माहिती दिली. या चर्चासत्राचे प्रास्ताविक, स्वागत व पाहुण्यांची ओळख डॉ. सुनील कदम यांनी केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ शुभांगी घाडगे यांनी तर आभार डॉ. वैभव मालुंजकर यांनी मानले. या कार्यक्रमाचे समन्वयक इंजि. अभिषेक दातीर होते. या चर्चासत्रासाठी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

मफुकृवि ई वार्ता

मे २०२५

वर्ष :५३, अंक क्रं. : ५३, मे, २०२५ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात कांदा बियाणे विक्रीला पहिल्या दिवशी प्रचंड प्रतिसाद



**दि. २६ मे, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. शरद गडाख व संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख शास्त्रज्ञ बियाणे डॉ. नितीन दानवले यांच्या देखरेखीखाली कृषि विद्यापीठातील बियाणे विक्री केंद्रात फुले समर्थ या कांदा बियाण्याची विक्री सुरू करण्यात आली. यावेळी पहिल्या दिवशी कांदा बियाणे विक्रीला शेतकऱ्यांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. याप्रसंगी डॉ. बी.टी. शेटे, डॉ. कैलास गागरे, सुरक्षा अधिकारी श्री. गोरक्ष शेटे व बियाणे विभागातील अधिकारी व कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

कांदा बियाणे विक्रीच्या सुलभतेसाठी विद्यापीठाने यावर्षी कांदा उत्पादक असणाऱ्या नाशिक, अहिल्यानगर व सातारा जिल्ह्यातील कृषि विद्यापीठाच्या अनेक केंद्रांमध्ये बियाणे विक्री व्यवस्था करण्यात आली आहे. यामध्ये नाशिक जिल्ह्यातील कृषि संशोधन केंद्र, निफाड, कांदा, लसूण व द्राक्ष संशोधन केंद्र, पिंपळगाव बसवंत, कृषि महाविद्यालय, मालेगाव या ठिकाणी विक्री करण्यात येत आहे. सातारा जिल्ह्यामध्ये कृषि विज्ञान केंद्र, बोरगाव, कृषि विज्ञान केंद्र, धुळे, कृषि महाविद्यालय, पुणे येथेही विक्री होत आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी येथे महात्मा फुले कृषि विद्यापीठ, कृषि महाविद्यालय, हळगाव, जामखेड, नगर–पुणे रस्त्यावरील कृषि संशोधन केंद्र, चास व कृषि संशोधन केंद्र, सावळीविहीर, ता. राहाता या ठिकाणी फुले समर्थ बियाणे विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात आले आहे. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे ७२८८ किलो बियाणे व उर्वरित नऊ जिल्ह्यातील विक्री केंद्रामध्ये ३७१२ किलो असे मिळून ११.० टन कांदा बियाणे विक्रीसाठी उपलब्ध असल्याचे बियाणे विभागाचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. नितीन दानवले यांनी सांगितले.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठाकडून कासारे गावातील शेतकऱ्यांना कृषि साहित्याचे वाटप



**दि. २७ मे, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. शरद गडाख, संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के यांच्या मार्गदर्शनाखाली व कृषि अभियांत्रिकी विभाग प्रमुख तथा स्मार्ट इरिगेशन प्रकल्पाचे प्रमुख संशोधक डॉ. सुनील कदम यांच्या देखरेखीखाली नवी दिल्ली येथील भारतीय कृषि अनुसंधान परिषद व कृषि अभियांत्रिकी विभाग, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे कार्यरत असलेल्या कन्सोरशिया रिसर्च

वर्ष :५३, अंक क्रं. : ५३, मे, २०२५ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

प्रोजेक्ट, आयओटी सक्षम व सेंसर आधारीत अद्ययावत सिंचन व्यवस्थापन प्रणाली प्रकल्पांतर्गत कृषि साहित्यवाटप कार्यक्रमाचे आयोजन मौजे कासारे, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर येथे करण्यात आले होते. याप्रसंगी स्मार्ट इरिगेशन प्रकल्पाचे सहप्रमुख संशोधक डॉ. प्रमोद पोपळे, कासारे गावचे सरपंच श्री. शिवाजी निमसे, संशोधन सहयोगी डॉ. शुभांगी घाडगे, वरिष्ठ संशोधन सहयोगी इंजि. शुभम सुपेकर आणि इंजि. गणेश उपस्थित होते. यावेळी स्मार्ट इरिगेशन प्रकल्पांतर्गत अनुसूचित जाती उपयोजनेच्या माध्यमातून कासारे गावातील १९ शेतकऱ्यांना कृषि साहित्याचे वाटप करण्यात आले. यामध्ये कृषि अवजारे, जैविक खते, जैविक औषधे व कृषिदर्शनी–२०२५ या साहित्याचा समावेश होता. याप्रसंगी डॉ. प्रमोद पोपळे यांनी प्रकल्पाविषयी सविस्तर माहिती देऊन शेतीसाठी उपयुक्त आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती दिली. यावेळी त्यांनी भूगर्भातील पाणीसाठा वाढवण्यासाठी फायदेशीर ठरणाऱ्या विविध पद्धतींची आणि मृदा व जलसंधारण याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व स्वागत श्री. शिवाजी निमसे यांनी केले.

## पुरस्कार

### आय. सी. ए. आर. स्पोर्ट्समध्ये महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या संघाने मिळविले उल्लेखनीय यश




**दि. ७ मे, २०२५.** दि. २ ते ५ मे, २०२५ या कालावधीत आचार्य नरेंद्र देव कृषि एवं प्रादयोगिक विश्वविद्यालय कुमारगंज, आयोध्या, उत्तरप्रदेश येथे संपन्न झालेल्या भा. कृ. अ.प. च्या अखिल भारतीय आंतरकृषि विद्यापीठ क्रीडा स्पर्धा २०२४–२५ मध्ये महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या संघाने चार सुवर्ण, तीन रजत व तीन कांस्यपदके पटकावून उल्लेखनीय कामगिरी केली. या यशाबद्दल महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. शरद गडाख यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे. विद्यापीठाच्या संघाने मिळविलेल्या या यशाबद्दल पदव्युत्तर महाविद्यालयाच्या सभागृहात सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे होते. याप्रसंगी विद्यापीठाचे विद्यार्थी कल्याण अधिकारी तथा संचालक राष्ट्रीय सेवा योजना डॉ. सुनील भणगे, पदव्युत्तर महाविद्यालयाचे विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. विजय पाटील, पुणे कृषि महाविद्यालयाचे सहाय्यक प्राध्यापक शारीरिक शिक्षण डॉ. अभिजीत नलावडे, कोल्हापूर कृषि महाविद्यालयाचे सहाय्यक प्राध्यापक शारीरिक शिक्षण प्रा. रामचंद्र बोरसे, विद्यापीठाचे क्रीडा अधिकारी डॉ. विलास आवारी, महाविद्यालयाचे सहाय्यक प्राध्यापक शारीरिक शिक्षण डॉ. बाबासाहेब भिंगारदे व विद्यापीठाचे माजी क्रीडा अधिकारी प्रा. दिलीप गायकवाड उपस्थित होते.

याप्रसंगी डॉ. साताप्पा खरबडे म्हणाले की विद्यापीठाला अधिस्वीकृती मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांच्या विविध प्रकारच्या उपक्रमांची गरज असते. यामध्ये स्पोर्ट्स हा विषय अत्यंत महत्त्वाचा आहे. विद्यापीठाच्या संघाने अखिल भारतीय आंतरकृषि विद्यापीठ क्रीडा स्पर्धेमध्ये उल्लेखनीय यश मिळवून विद्यापीठाचा नावलौकिक उंचावला आहे. याप्रसंगी डॉ. सुनील भणगे व डॉ. अभिजीत नलावडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या अखिल भारतीय अंतरकृषि विद्यापीठ क्रीडा स्पर्धेमध्ये विद्यापीठाच्या कबड्डी संघाने (मुले)–सुवर्णपदक, खो–खो (मुले)–सुवर्णपदक, खो–खो (मुली)–सुवर्णपदक, भालाफेक व गोळा फेक यामध्ये अनुक्रमे सुवर्णपदक व रजत पदक वृंदा गांजुरे हिने पटकविले. ८०० मीटर धावणे या स्पर्धेत श्रेयस जगदाळे याला रजत पदक तर ४ x १०० मीटर रिले धावणे (मुली) या प्रकारात तन्वी मोरे, प्रणाली काशीद, हर्षाली महाले व प्रतीक्षा मालशिकारे यांनी रजत पदक मिळविले. ५००० मीटर धावणे या प्रकारात ओम पिंपळे याला कांस्यपदक, भालाफेक मध्ये सुशांत केचे याला कांस्यपदक तर १५०० मीटर धावणे या प्रकारामध्ये प्रतीक्षा मालशिकारे हिने कांस्यपदकाची कमाई केली.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण अधिकारी कार्यालयाचे कर्मचारी श्री. दिनेश भालेराव यांना महाराष्ट्र दिनाच्या दिवशी महाराष्ट्र शासनाचा गुणवंत संघटक पुरस्कार प्रदान करण्यात आला. यानिमित्ताने श्री. दिनेश भालेराव यांचाही यावेळी मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.विद्यापीठाच्या संघास डॉ. अभिजीत नलावडे व प्रा. रामचंद्र बोरसे यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. विलास आवारी यांनी केले. यावेळी यशस्वी विद्यार्थ्यांसह विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## कृषि अभियांत्रिकी विभागाचे प्रमुख डॉ. सुनिल कदम उत्कृष्ट कृषि संशोधक पुरस्काराने सन्मानित



**दि. २९ मे, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठातील कृषि अभियांत्रिकी विभागाचे विभाग प्रमुख व काटेकोर शेतीसाठी डिजिटल तंत्रज्ञानावर आधारित सेंटर ऑफ एक्सलन्स प्रकल्पाचे प्रमुख संशोधक डॉ. सुनील कदम यांना उत्कृष्ट कृषि संशोधक २०२५ या पुरस्काराने मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे हस्ते सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार त्यांना वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी व महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांचे संयुक्त विद्यमाने राज्याच्या चारही विद्यापीठाच्या ५३ व्या संयुक्त कृषि संशोधन आणि विकास समितीच्या उद्घाटन कार्यक्रमात देण्यात आला. याप्रसंगी राज्याचे कृषिमंत्री तथा कृषि विद्यापीठांचे प्रतिकूलपती ॲड. माणिकराव कोकाटे, पालकमंत्री श्रीमती मेघना बोर्डीकर, राज्यमंत्री श्री. आशिष जैस्वाल, खा. संजय जाधव, आ. डॉ. राहुल पाटील, आ.डॉ. रत्नाकर गुट्टे, आ. सतीश चव्हाण, आ. राजेश विटेकर, महाराष्ट्र राज्याचे प्रधान सचिव (कृषि) श्री. विकास रस्तोगी, महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणीचे कुलगुरू डॉ. इंद्रामणी, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोलीचे कुलगुरू डॉ. संजय भावे, पोकराचे संचालक श्री. परिमल सिंह तसेच महाराष्ट्र शिक्षण व संशोधन परिषद, पुणेचे महासंचालक श्री. रावसाहेब भागडे उपस्थित होते.

## डॉ. जयप्रकाश गायकवाड यांना हाँगकाँग येथील आंतरराष्ट्रीय परिषदेत संशोधनपर लेख सादरीकरणाबद्दल विशेष पुरस्कार प्रदान




**दि. २९ मे, २०२५.** दि. २६ ते २९ मे २०२५ दरम्यान नागपूर येथील वन जन हक्क फाऊंडेशन तसेच व्हीएमएस रिसर्च फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने हाँगकाँग या देशात शाश्वत विकासासाठी सामाजिक कार्यातील नाविन्यपुर्ण बाबी, विज्ञान, सामाजिक शास्त्रे आणि तंत्रज्ञान या

विषयावर आंतराष्ट्रीय परिषद आयोजीत करण्यात आली होती. या परिषदेत कृषि महाविद्यालय, धुळे येथील विस्तार शिक्षण विभागातील सहयोगी प्राध्यापक डॉ. जयप्रकाश गायकवाड यांच्या संशोधनपर लेखाची निवड झाली होती. या संशोधनपर लेखाच्या सादरीकरणासाठी त्यांना निमंत्रीत करण्यात आले होते. डॉ. जयप्रकाश गायकवाड यांना सदर आंतरराष्ट्रीय परिषदेत उत्कृष्ट संशोधनपर लेख सादरीकरणाबद्दल विशेष पुरस्कार प्रदान करण्यात आला. सदरचा पुरस्कार डॉ पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला येथील माजी अधिष्ठाता डॉ. पी. जी. इंगोले, अकोला येथील वनस्पती रोगशास्त्रज्ञ अशोसिएशन सेंट्रल इंडियाचे उपाध्यक्ष डॉ कुलदिपसिंग ठाकुर, ब्रिसबेन, ऑस्ट्रेलिया येथील प्रोफेसर व्यंकट पुल्ला, IMC-२०२५ चे सेक्रेटरी व व्हीएमएस रिसर्च फाऊंडेशन, नागपूरचे कनव्हेनर डॉ. आशिष लांबट व नागपूर येथील वन जन हक्क फाऊंडेशन कॉन्फरन्सचे संचालक प्रा. केशव वाळके या मान्यवरांच्या हस्ते सदरचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

## कृषि महाविद्यालयातील विविध उपक्रम

### अखिल भारतीय क्रीडा स्पर्धेत कृषि महाविद्यालय, धुळेचे यश




**दि. ५ मे, २०२५.** आचार्य नरेंद्र देव कृषि आणि अभियांत्रिकी विद्यापीठ, कुमारगंज, अयोध्या, उत्तर प्रदेश येथे भा.कृ.अ.प अंतर्गत अखिल भारतीय आंतरकृषि विद्यापीठ क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत महात्मा फुले कृषि विद्यापिठाच्या संघात सहभागी होऊन कृषि महाविद्यालय, धुळे येथील विद्यार्थी खेळाडूंनी दोन सुवर्ण, एक रौप्य व एक कांस्य पदक मिळवून एकूण ४ पदके पटकावून उल्लेखनीय कामगिरी केली. या यशाबद्दल विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. शरद गडाख, अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे व महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. बबनराव इल्हे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. महाविद्यालयाचे यशस्वी खेळाडू कु. सुशांत केचे (कबड्डी सुवर्ण पदक व भालाफेक कास्य पदक विजेता) आणि कुमारी वृंदा गांजुरे (भालाफेक सुवर्ण पदक व गोळाफेक रौप्य पदक विजेती) यांचे कृषि महाविद्यालय, धुळे येथे अभिनंदन व सत्कार करण्यात आला. या प्रसंगी डॉ. बबनराव इल्हे यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास होण्यासाठी शैक्षणिक उपक्रमात खेळांचे अनन्य साधारण महत्व आहे. अखिल भारतीय आंतरकृषि विद्यापीठ क्रीडा स्पर्धेत कृषि महाविद्यालय, धुळे येथील खेळाडूंनी घवघवीत यश संपादन करुन महाविद्यालयाचे नावलौकिक केले आहे असे वक्तव्य त्यांनी केले. या सत्कार प्रसंगी विद्यार्थी परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. राहूल देसले यांनी देखील विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. सदर कार्यक्रमास विद्यार्थी कल्याण अधिकारी प्रा. जितेंद्र सुर्यवंशी, नोडल अधिकारी डॉ. विक्रांत भालेराव, एन.सी.सी. अधिकारी डॉ. पंकज देवरे, डॉ. संजीव वाडीले, सहाय्यक कुलसचिव श्री. राजाराम महाले तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक, अधिकारी व विद्यार्थी उपस्थित होते.

### हाळगाव येथील कृषि महाविद्यालयात ६५ वा महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा

**दि. १ मे, २०२५.** हाळगाव येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालयात ६५ वा महाराष्ट्र दिन व आंतरराष्ट्रीय कामगार दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. अनिल काळे यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. याप्रसंगी विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. विवेकानंद कुलकर्णी, राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रा. पोपट पवार, डॉ. प्रेरणा भोसले, डॉ. गोकुळ वामन, डॉ. मनोज गुड, डॉ. नजिर तांबोळी, डॉ. निलेश लांडे, डॉ. महेश निकम, डॉ. अंबादास मेहेत्रे, डॉ. निकिता धाडगे, डॉ. उत्कर्षा गवारे, अर्चना महाजन, डॉ. प्रणाली ठाकरे, डॉ. अविनाश हांडाळ, डॉ. किरण चौधरी, डॉ. संदीप मोरे, श्री. महादू शिंदे, डॉ. दिपक वाळुंजकर उपस्थित होते.






यावेळी डॉ. अनिल काळे मार्गदर्शन करतांना म्हणाले की महाराष्ट्र राज्याच्या गौरवशाली इतिहासाचा गौरव करणारा दिवस म्हणजेच महाराष्ट्र दिन व जगभरातील कामगारांच्या चळवळीची आठवण करून देणारा दिवस म्हणजेच आंतरराष्ट्रीय कामगार दिन. इतिहासातील हे महत्वाचे दिवस एकता, प्रगती आणि आपल्या समाजाला आकार देण्यासाठी थोर व्यक्तींनी केलेल्या योगदानाची आठवण करून देतात. हे उत्सव आपला सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी, कामगारांच्या हक्कांसाठी आणि सामाजिक न्यायासाठी लढा देण्याची महत्त्वाची आठवण करून देतात. यावेळी आंतरराष्ट्रीय कामगार दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयातील कामगारांना पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले. सदर कार्यक्रमास शिक्षकेतर कर्मचारी श्री. अमृता सोनावणे, श्री. प्रदिप धारेकर, श्री. किरण अडसुर, श्री. शशिकांत कांबळे, श्री. मुबिन नदाफ, श्री. संजय सोनवणे, श्री. अनिता पुराणे, श्री. अनिकेत कुंभार, श्री. गंगाराम रंधवे, ग्रामस्थ श्री. आबासाहेब ढवळे, श्री. संदीप ढवळे प्रगतशील शेतकरी श्री. शरद ढवळे, विद्यार्थी व सुरक्षा रक्षक उपस्थित होते. सदर कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी डॉ. विवेकानंद कुलकर्णी, डॉ. अविनाश हांडाळ यांनी विशेष मेहनत घेतली.

## कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे छत्रपती संभाजी महाराजांची जयंती साजरी





**दि. १४ मे, २०२५.** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. अनिल काळे यांच्या उपस्थितीत छत्रपती संभाजी महाराजांची ३६८ वी जयंती साजरी करण्यात आली. डॉ. अनिल काळे यांनी छत्रपती संभाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पूजन केले. याप्रसंगी डॉ. प्रणाली ठाकरे यांनी स्वराज्य अबाधित ठेवण्यासाठी महाराजांनी केलेल्या महान कार्याची आठवण विद्यार्थ्यांना करून दिली. तसेच त्यांच्या जीवनातील निवडक प्रसंग उपस्थितांसमोर मांडून शौर्याचा गौरव केला. सदर कार्यक्रमास महाविद्यालयातील विद्यार्थी परिषद उपाध्यक्ष तथा प्राध्यापक कृषि विद्या डॉ. दत्तात्रय सोनवणे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. पोपट पवार, डॉ. निलेश लांडे, डॉ. निकीता धाडगे, डॉ. प्रणाली ठाकरे, अर्चना महाजन, डॉ. महेश निकम, डॉ. अनिकेत गायकवाड, डॉ. अविनाश हांडाळ, डॉ. संदीप मोरे, डॉ. किरण चौधरी, श्री. महादू शिंदे, श्री. अमृता सोनवणे, श्री. सुरेश माकरे, श्री. संभाजी ठवाळ, श्री. रामदास गुहाडे, श्री. किरण अडसुर, श्री. प्रदीप धारेकर आणि विद्यार्थी उपस्थित होते.

वर्ष :५३, अंक क्रं. : ५३, मे, २०२५ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवस साजरा






**दि. २१ मे, २०२५.** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय, हाळगावचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. अनिल काळे यांच्या मार्गदर्शनाखाली दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवस साजरा करण्यात आला. याप्रसंगी विद्यार्थी परिषदेचे उपाध्यक्ष तथा प्राध्यापक कृषिविद्या डॉ. दत्तात्रय सोनवणे यांनी आपल्या भाषणामध्ये विद्यार्थ्यांमध्ये दहशतवादाचा धोका आणि हिंसाचाराचा परिणाम याबद्दल जागरूकता निर्माण करण्याविषयी मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. दत्तात्रय सोनवणे यांनी माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पूजन केले. याप्रसंगी दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवसाची शपथ घेण्यात आली. सदर कार्यक्रमास महाविद्यालयातील विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. विवेकानंद कुलकर्णी, डॉ. गोकुळ वामन, डॉ. अनिकेत गायकवाड, डॉ. संदीप मोरे, डॉ. किरण चौधरी, श्री. महादू शिंदे, श्री. अमृता सोनवणे, श्री. संभाजी ठवाळ, श्री. किरण अडसुर, श्री. शशिकांत कांबळे आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे स्वातंत्र्यवीर सावरकर यांची जयंती साजरी





**दि. २८ मे, २०२५.** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय हाळगावचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. अनिल काळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांची १४२ वी जयंती साजरी करण्यात आली. डॉ. दत्तात्रय सोनवणे यांनी स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पूजन केले. याप्रसंगी, अनिकेत मिंड याने स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या कार्याची माहिती दिली. त्यांची १८५७ च्या उठावातील भूमिका, राजकीय आणि सामाजिक कार्य, साहित्यातील योगदान यावर भर दिला. सदर कार्यक्रमास महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. पोपट पवार, डॉ. गोकुळ वामन, डॉ. प्रणाली ठाकरे, डॉ. अनिकेत गायकवाड, डॉ. अविनाश हांडाळ, श्री. महादू शिंदे, श्री. संजय आढाव, श्री. संभाजी ठवाळ, श्री. किरण अडसुर, श्री. प्रदीप धारेकर आणि विद्यार्थी उपस्थित होते.

वर्ष :५३, अंक क्रं. : ५३, मे, २०२५ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी





**दि. ३१ मे, २०२५.** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय, हाळगावचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. अनिल काळे यांच्या मार्गदर्शनाखाली पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०० वी जयंती साजरी करण्यात आली. यावेळी राजमाता अहिल्यादेवी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले. याप्रसंगी डॉ. अनिकेत गायकवाड यांनी अहिल्यादेवींच्या कार्याची माहिती दिली. अहिल्यादेवी होळकर यांची ओळख भारतीय इतिहासातील एक कुशल महिला शासक अशी आहे. ज्यांच्या निष्पक्षतेची आणि सुशासनाची अनेक उदाहरणे आहेत. त्यांनी आपल्या पराक्रमाने मैदान गाजवलेच आणि त्याबरोबरच देशभरातील हिंदू मंदिरांच्या निर्मात्या आणि संरक्षक म्हणूनही कार्य केले असेही त्यांनी सांगितले. सदर कार्यक्रमास डॉ. अनिकेत गायकवाड, श्री. सुरेश माकरे, श्री. शशिकांत कांबळे, श्री. अनिकेत कुंभार आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## कृषि महाविद्यालय, काष्टी येथील विद्यार्थ्यांची गुजरात येथे शैक्षणिक सहलीचे आयोजन





**दि. १६ मे, २०२५.** छत्रपती शिवाजी महाराज कृषि विज्ञान संकुल, कृषि महाविद्यालय, काष्टी, मालेगाव येथील चौथ्या सत्राच्या विद्यार्थ्यांसाठी गुजरात राज्यात शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले होते. ह्या शैक्षणिक भेटीसाठी संकुलाचे प्रमुख व कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सचिनकुमार नांदगुडे यांचे मार्गदर्शन लाभले. पाचव्या अधिष्ठाता समितीनुसार कृषि शिक्षणामध्ये अंतर्भूत केलेल्या EDTN-२४२ (Education tour) ह्या विषयांतर्गत विद्यार्थ्यांना कृषि शिक्षण व संशोधन ह्यासबंधी माहिती मिळावी ह्या उद्देशाने गुजरात राज्यातील आनंद कृषि विद्यापीठ, आनंद, नवसारी कृषि विद्यापीठ, नवसारी, व वाघोली येथील राष्ट्रीय उद्यान व बोटॅनिकल गार्डन येथे भेट देण्यात आली. आनंद कृषि विद्यापीठ येथील शेतीप्रयोग प्रक्षेत्र, सरदार वल्लभभाई कृषि संग्रहालय, औषधी व सुगंधी वनस्पती केंद्र, बन्सीलाल अमृतलाल कृषि महाविद्यालय, अन्नतंत्रज्ञान व जैविक उर्जा महाविद्यालय, अन्न तंत्रज्ञान इनक्यूबेशन केंद्र, कृषि व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय इ. ठिकाणी भेटी देत विविध कृषि प्रकल्प आणि सदस्थितीतील कृषि तंत्रज्ञानाची प्रगती याविषयी माहिती घेतली.

तसेच नवसारी येथील कृषि विद्यापीठ येथे आधुनिक जैव तंत्रज्ञानाची माहिती घेत केळीच्या उत्ती संवर्धन युनिट प्रात्यक्षिक प्रदर्शन बघितले. स्पीड ब्रीडिंग ह्या नवीन तंत्रज्ञानाद्वारे नवीन वाण विकसित करण्यासाठी कमी वेळ लागतो ह्या संदर्भातील तांत्रिक माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. शैक्षणिक सहलीसाठी संकुलाचे वरिष्ठ प्राध्यापक डॉ. एस. पी. सोनवणे, कुलमंत्री डॉ. एस. डी. पाटील, विद्याशाखा प्रमुख डॉ. डी. आर. बिरारी, सहाय्यक कुलसचिव श्री. नारायण पाठक आणि डॉ. एस. एस. गडाख यांचे मार्गदर्शन लाभले. नियोजन व व्यवस्थापन डॉ. पी.एन. सोनवणे, डॉ. ए.आर. खैरे, डॉ. एम.सी. चौरे, डॉ. एस.पी. देवकर व श्री. ऋषिकेश देशमुख यांनी केले.

## कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे ६५ वा महाराष्ट्र दिन तसेच आंतरराष्ट्रीय कामगार दिन उत्साहात साजरा






**दि. १ मे, २०२५.** कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे ६५ वा महाराष्ट्र दिन तसेच आंतरराष्ट्रीय कामगार दिन उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संदीप पाटील यांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी मार्गदर्शन करतांना डॉ. संदीप पाटील यांनी महाराष्ट्र दिनाचा इतिहास सांगतांना १९५६ च्या राज्य पुनर्रचना कायद्याने भारतातील राज्यांच्या सीमा भाषेच्या आधारावर निश्चित केल्या असे सांगितले. तसेच यावेळी झालेल्या पोलिस लाठीचार्जमध्ये १०६ आंदोलकांना आपले प्राण गमवावे लागले होते आणि त्यामुळेच ०१ मे १९६० मध्ये स्वतंत्र महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले असेही डॉ. पाटील म्हणाले. आंतरराष्ट्रीय कामगार दिनाबाबत सांगताना ते म्हणाले, १८८६ साली कामगारांनी आपल्या हक्कासाठी एकत्र येऊन अन्यायाविरुद्ध आवाज उठवला होता. भारतात पहिला कामगार दिन १९२३ मध्ये चेन्नई येथे साजरा करण्यात आला असेही डॉ. पाटील म्हणाले. याप्रसंगी महाविद्यालयाचे सहाय्यक कुलसचिव श्री. प्रशांत नागे, डॉ. रमेश चौधरी, डॉ. गणेश देशमुख, डॉ. रियाज शेख, सहाय्यक नियंत्रक श्री. विजय पाटील, डॉ. कुशल ढाके, श्री. सागर पाटील, डॉ. रवींद्र जाधव आणि सर्व कर्मचारी तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन डॉ. रियाज शेख यांनी केले.

## कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे यांची सदिच्छा भेट

**दि. १३ मे, २०२५.** कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे अधिष्ठाता (कृषि) डॉ. साताप्पा खरबडे यांनी सदिच्छा भेट दिली. याप्रसंगी कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगरचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संदीप पाटील यांनी डॉ. साताप्पा खरबडे यांचा शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला आणि महाविद्यालयातील कामकाजाचा आढावा आणि महाविद्यालयामध्ये सुरू असलेल्या विकास कामांची माहिती दिली. या भेटी दरम्यान डॉ. साताप्पा खरबडे यांनी महाविद्यालयाचे प्रक्षेत्र, फळबाग तसेच विविध विभागांना भेट दिली. सोबतच त्यांनी महाविद्यालयाचे अधिकारी व कर्मचारी यांचेशी सुसंवाद साधला. डॉ. खरबडे यांनी उपस्थितांना संबोधीत करतांना कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगरच्या विकासासाठी प्राधान्याने आणि वेळेवर निधी उपलब्ध करून दिला जात आहे आणि भविष्यात सुद्धा दिला जाईल असे प्रतिपादन केले. तसेच महाविद्यालयाच्या कामकाजाबाबत समाधान व्यक्त करून महाविद्यालयाच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. डॉ. साताप्पा खरबडे यांनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना भविष्यामध्ये पदव्युत्तर शिक्षणासाठी आवश्यक







असणाऱ्या विविध परीक्षांची तयारी आतापासूनच करणे गरजेचे आहे असे सांगितले. याप्रसंगी महाविद्यालयाचे सहाय्यक कुलसचिव श्री. प्रशांत नागे, डॉ. दत्तात्रय पाचरणे, डॉ. रमेश चौधरी, डॉ. गणेश देशमुख, श्री. एन. जी. धुर्वे, सहा. नियंत्रक श्री. विजय पाटील, डॉ. कुशल ढाके, डॉ. तुषार भोसले, डॉ. सागर बंड, डॉ. मनीषा पालवे आणि सर्व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन डॉ. रमेश चौधरी यांनी केले.

## कृषि महाविद्यालय, नंदुरबार येथे आमदार मा. श्री. विजयकुमार गावीत यांची भेट



**दि. १५ मे, २०२५.** कृषि महाविद्यालय, नंदुरबार येथे माजी आदिवासी विकास मंत्री व विद्यमान आमदार मा. श्री. विजयकुमार गावीत यांनी भेट दिली. या भेटी दरम्यान आमदार श्री. विजयकुमार गावीत यांनी महाविद्यालयातील विकास कामाबाबत समाधान व्यक्त केले. कृषि महाविद्यालयाचे सहयोगी आधिष्ठाता डॉ. यू.बी. होले यांनी विविध विकासकामाचा व इतर कामाचा आढावा सादर केला. यावेळी आमदार श्री. विजयकुमार गावीत यांनी कर्मचाऱ्यांच्या समस्या जाणून घेतल्या व त्या सोडविण्याचे आश्वासन दिले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. एस. जी. राजपूत यांनी केले, तर डॉ.पी. पी. गिरासे यांनी सर्वांचे आभार मानले.

## कृषिकन्यांनी केले नवलाणे गावात सर्वेक्षणासह मार्गदर्शन

**दि. ११ मे, २०२५.** ग्रामीण जागरूकता आणि कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत धुळे येथील कृषि महाविद्यालयाच्या अंतिम वर्षातील विद्यार्थिनी अर्थात कृषिकन्यांनी नवलाणे येथे गाव सर्वेक्षण केले. त्यांनी ग्रामपंचायत कार्यालयाजवळ गावाचा नकाशा काढून ग्रामस्थांचे लक्ष वेधले. शेतकऱ्यांना शासन आणि अन्य कृषि विद्यापीठांनी निर्मित केलेले नवीन वाण, शेतीच्या नवीन पद्धती, माती परीक्षण आणि पिकांची योग्य निवड करणे आर्दीची माहिती मिळावी या उद्देशाने हा उपक्रम राबवण्यात आला. या उपक्रमांतर्गत साक्षी चव्हाण, ऋतुजा पाटील, प्राची मुळे, तनुजा मेढे, अंजली कांबळे, आस्था दमाहे, साक्षी फड यांनी मार्गदर्शन केले. त्या पुढील अडीच महिने परिसरात कार्य करणार आहेत. सरपंच




श्री. भीमा सूर्यवंशी, श्री. अरुण पिंपळे, श्री. मनोज सूर्यवंशी, श्री. दीपक बागुल, श्री. राहुल बागुल, श्री. विठ्ठल पिंपळे आदी उपस्थित होते. त्यांना सहयोगी अधिष्ठाता  डॉ. बी. एम. इल्हे, ग्रामीण कृषि जागरूकता व कृषि औद्योगिक कार्यानुभव कार्यक्रमाचे चेअरमन डॉ. जयप्रकाश गायकवाड आदींचे मार्गदर्शन लाभत आहे.

## धुळे कृषि महाविद्यालयातील कृषिदुतांनी केले झिरो एनर्जी कूलिंग चेंबरचे सादरीकरण



**दि. १२ मे, २०२५.** धुळे कृषि महाविद्यालयाच्या अंतिम वर्षातील कृषिदूतांनी देऊर (खु) गावात 'झिरो एनर्जी कूलिंग चेंबर'चे प्रात्यक्षिक सादर करत शेतकऱ्यांपुढे एक आश्वासक दिशा उभी केली. विज्ञानाच्या मदतीने थेट जमिनीवर उतरलेला हा प्रयोग वीजेविना थंडाव्याचं पर्यावरणपूरक तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोचविण्याचा प्रयत्न कृषिदुतांनी केला आहे. या शीतकक्षामुळे शेतकऱ्यांना भाजीपाल्यांची साठवण करता येईल. सर्व फळे व पालेभाज्या टवटवीत, आकर्षक आणि फ्रेश राहतील. चांगल्या दर्जामुळे चांगला दरही मिळतो. फळांची पिकण्याची प्रक्रिया मंद गतीने होते आणि त्यांच्या वजनात घटही येत नाही. यासाठी कमी खर्च लागतो व त्यामुळे शेतकऱ्यांचे जास्त नुकसान न होता भाजीपाल्यास चांगला दर मिळतो अशी माहिती कृषिदुतांनी दिली. या संकल्पनेचा प्रसार करण्यासाठी मक्सुदअहमद मुल्लानी, विक्रम कदम, पवन चव्हाण, अनिकेत मगदूम, ऋषिकेश गोडसे, गुरुदत्त खोपडे आणि विकास चौगुले या कृषिदूतांनी गावामध्ये प्रत्यक्ष मॉडेल उभारून गावकऱ्यांशी संवाद साधला. या उपक्रमाला महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. बी. एम. इल्हे, कार्यक्रम समन्वयक डॉ.जे.एच. गायकवाड, चेअरमन डॉ. एस.डी. पाटील, डीन प्रतिनिधी डॉ. व्ही. पी. भालेराव, कार्यक्रम अधिकारी डॉ. नितीश घोडके यांनी मार्गदर्शन केले. तसेच विविध विषयातील तज्ज्ञांचे सहकार्यही यावेळी मिळाले.

## म्हसदी येथे कृषिदूतांनी केली माती परीक्षणाची जागृती




**दि. १२ मे, २०२५.** धुळे कृषि महाविद्यालयाच्या 'ग्रामीण कृषि जागरूकता व कृषि औद्योगिक कार्यानुभव योजना' अंतर्गत चतुर्थ वर्षातील विद्यार्थ्यांनी म्हसदी गावात कृषिदुत म्हणून कार्याला सुरुवात केली. पहिल्याच दिवशी कृषिदूतांनी काही शेतकऱ्यांच्या शेतातील मातीचे नमुने घेऊन प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवत माती परीक्षणाचे महत्त्व समजावून देत शेतकऱ्यांमध्ये जागृती निर्माण केली. माती परीक्षणामुळे जमिनीत असलेल्या पोषक तत्वांचे प्रमाण, पीक निवड, मातीचे प्रकार, पाणी धारण क्षमतेसह आवश्यक अन्नद्रव्यांची माहिती मिळते. हे ज्ञान शेतकऱ्यांना उत्पादन वाढीसाठी उपयुक्त ठरते, असे कृषिदूतांनी सांगितले. कृषिदूतांच्या स्वागतप्रसंगी गावातील शेतकरी उपस्थित होते. यावेळी कृषिदूतांनी प्रत्यक्ष शेतात जाऊन मातीचे नमुने घेतले. त्यानंतर शेतकऱ्यांशी संवाद साधत आधुनिक शेती तंत्रज्ञानाबाबत मार्गदर्शन केले. या उपक्रमासाठी सहयोगी अधिष्ठाता डॉ. बी. एम. इल्हे, कार्यक्रम समन्वयक डॉ. गायकवाड, केंद्रप्रमुख डॉ. पाटील आणि कार्यक्रम अधिकारी प्रा. नितीश घोडके यांचे मार्गदर्शन लाभले. कृषिदूत म्हणून प्रथमेश धनगर, कृष्णा केदारे, विवेक गावित, सौरभ पाटील, अर्थव देवरे, अशिष चौधरी, जयदीप गावित, वैभव पवार हे विद्यार्थी म्हसदीमध्ये कार्यरत आहेत.

## जून महिन्यातील कामांचा तपशील

### ऊस

- आडसाली ऊसाच्या लागणपूर्व तयारीच्या दृष्टिने जमिनीची निवड, पूर्वशागत, रान बांधणी, ऊस जाती, बेणे उपलब्धता, सेंद्रिय आणि रासायनिक खत पुरवठा, तणनाशके व आंतरपिके याबाबत मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्र, पाडेगाव येथील शास्त्रज्ञांशी सल्लामसलत करुन योग्य ती तजवीज करुन ठेवावी.
- पूर्वहंगामी आणि आडसाली ऊस जोदार वाढीच्या अवस्थेत असून, जमिनीतील ओल, पाऊसमान पाहून उपलब्धतेनुसार नियमित पाणी पुरवठा करावा.
- उशीरा लागण झालेल्या सुरु ऊसास मोठया बांधणीच्या वेळी १०० किलो नत्र (२१७ किला युरिया) (४.८२ पोती), ५५ किलो स्फुरद (३४४ किलो सिंगल सुपर फॉस्फेट) (७.६४ पोती), आणि ५५ किलो पालश (९२ किलो म्युरेट ऑफ पोटॅश) (२.०४ पोती) अशी प्रती हेक्टरी रासायनिक खतांची मात्रा द्यावी.
- ऊसास युरियाची मात्रा देताना निंबोळी पेंडीची बारीक भुकटी एक किलो व सहा किलो युरिया असे प्रमाण ठेवावे.
- खोडवा ऊसास (खोडवा ठेवल्यानंतर १३५ दिवसांनी) पहारीच्या सहाय्याने खतांचा दुसरा हप्ता म्हणजेच १२५ किलो नत्र (२७२ किलो युरिया) (६.०४ पोती),, ५५ किलो स्फुरद (३४४ किलो सिंगल फॉस्फेट) (७.६४ पोती) आणि ५५ किलो पालश (९२ किलो म्युरेट ऑफ पोटॅश) (२.०४ पोती) अशी प्रति हेक्टरी रासायनिक खतांची मात्रा द्यावी.
- पट्टा पध्दत आणि सूक्ष्म जलसिंचन पध्दत यांचा अवलंब केल्यास ऊसावरील पाण्याचा ताण कमी करता येईल.
- ठिबक सिंचनाची सोय असल्यास २१ ते २६ अठवडयांपर्यंतच्या सुरू व खोडवा ऊसाला वाढीच्या अवस्थेनुसार एकरी ४ किलो पांढरे म्युरेट ऑफ पोटॅश प्रति आठवडा ठिबक सिंचन प्रणाली मधून द्यावीत. ऊस क्षेत्र तणविरहीत ठेवा.

वर्ष :५३, अंक क्रं. : ५३, मे, २०२५ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

- ❖ हुणीचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी रात्रीच्या वेळी कडुलिंब, बोर, बाभूळ या झाडांवर जमा होणारे हुणीचे भुंगेरे गोळा करुन रॉकेलमि श्रीत पाण्यात टाकून त्यांचा नाश करावा. हा उपक्रम सामुदायिकरिण्या २–३ वेळा करावा.
- ❖ कांडीकिडीचा प्रादुर्भाव असल्यास ट्रायकोग्रा चिलोनिस या परोपजीवी मित्रकिटकाचे ५ ट्रायकोकार्ड प्रति हेक्टरी वापरावेत.
- ❖ ऊस पिकास पायरीलाचा प्रादुर्भाव असल्सास इपटीकॉनिया मेल्यॅनोल्युका या परोपजीवी मित्र किटकाचे ५००० जिवंत कोष अथवा ५०००० अंडीपुंज प्रती हेक्टरी वापरावेत.

## बागायती कापूस

- ❖ बीटी कापूस लागवडीनंतर ३० दिवसानी नत्र खताचा दुसरा हप्ता (५० किलो नत्र प्रति हेक्टर) देवून पाणी द्यावे.
- ❖ बिगर बीटी कापूस लागवडीनंतर ३० दिवसांनी नत्र खताचा दुसरा हप्ता (४० किलो नत्र प्रति हेक्टर) देवून पाणी द्यावे.
- ❖ मावा, तुडतुडे इत्यादी रस शोषणाऱ्या किडीचा अधिक नुकसान पातळीपेक्षा जास्त प्रादुर्भाव दिसून आल्यास ५ टक्के निंबोळी अर्काची फवारणी करावी. लेडीबर्ड बिटल, क्रायसोपा या सारख्या मित्र किडींचे संवर्धन करावे.
- ❖ बीटी कपाशीमध्ये गुलाबी बोंड अळीच्या सर्वेक्षणासाठी शेतात हेक्टरी ५ कामगंध सापळे उभारावेत व त्यातील पेक्टीनो ल्यूर दर २१ दिवसांनी बदलावे.
- ❖ शेतामध्ये तण दिसून आल्यास ३० ते ३५ दिवसांनी एक खुरपणी करावी.

## कडधान्य पिके

### मूग आणि उडिद

- ❖ दुसऱ्या पंधरवाड्यात चांगला पाऊस झाल्यावर वापश्यावर बीजप्रकिया करुन पेरणी करावी. (प्रति किलो बियाणास ५ ग्रॅम ट्रायकोडर्मा व यानंतर २५ ग्रॅम रायझोबियम जीवाणूसंवर्धक).
- ❖ शिफारशीत ख़त मात्रा ( २० :४० :००/हेक्टर ) पेरणीवेळी द्यावी. म्हणजेच १०० किलो डीएपी प्रति हेक्टरी द्यावे.

### तूर

- ❖ दुसऱ्या पंधरवाड्यात चांगला पाऊस झाल्यावर बीजप्रकिया (२ ग्रॅम थायरम + २ ग्रॅम बाविस्टीन किंवा ५ ग्रॅम ट्रायकोडर्मा / किलो बियाणे व यानंतर २५० ग्रॅम रायझोबियम जीवाणूसंवर्धक/ १० किलो बियाणे ) करुन वापश्यावर पेरणी करावी. शक्यतो ७ जून ते ७ जुलै पर्यंत पेरणी करावी.
- ❖ शिफारशीत ख़त मात्रा पेरणीवेळी द्यावी.
- ❖ तणनाशकाचा वापर करावयाचा असल्यास पेरणीनंतर लगेच पुरेसा ओलावा असताना उगवणीपूर्व तणनाशक पेंडिमेथॉलीन फवारावे.
- ❖ पेरणीनंतर १० दिवसांनी नांग्या भराव्यात.

## भात

- ❖ रोपवाटीका नियोजन

### अ) सुधारीत जाती

| | | |
|---|---|---|
| ❖ पद्धत | बियाणे किलो प्रति हेक्टरी | |
| ❖ पुर्नलागवड | ३५–४० | |
| ❖ पेरणी | ७५ | |
| ❖ टोकण | (१५–२५ X १५–२५) | सें.मी. २५–३० |

वर्ष :५३, अंक क्रं. : ५३, मे, २०२५ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

### ब) संकरीत जातीसाठी प्रति हेक्टरी २० किलो बियाणे वापरावे

- बिजप्रक्रिया : पेरणीपूर्वी बियाणास ४ ग्रॅम प्रति किलोग्रॅम याप्रमाणे कॅप्टाफॉल (७५ डब्लु.पी.) बुरशीनाशक चोळावे. त्यानंतर ॲझोटोबॅक्टर, स्फुरद विरघळणारे जीवाणू व ॲझोस्पिरीलिअम या जीवाणू खतांची २५० ग्रॅम प्रति १० किलो बियाण्यास बीजप्रक्रीया करावी.

### पेरणी कालावधी व पेरणी अंतर

१. पुर्नलागवड भात : १ मीटर रुंदी, १५ सें.मी. उंची व सोईनुसार लांबी ठेवून गादी वाफ्यावर खरीप हंगामामध्ये १ जून ते ३० जून पर्यंत पेरणी करावी. साधारणतः १० गुंठ्याची रोपवाटीका १ हेक्टर लागवडीसाठी पुरेशी ठरते. रोपवाटीकेसाठी २५० ग्रॅम शेणखत, ५०० ग्रॅम नत्र, ४०० ग्रॅम स्फुरद, ५०० ग्रॅम पालाश प्रति गुंठा द्यावे. पेरणी ओळीत करावी. पेरणीनंतर १५ दिवसांनी ५०० ग्रॅम नत्र प्रति गुंठा रोपे वाढीसाठी द्यावे.

२. पेरभात : भात बियाणे २२.५ किंवा ३० सें.मी. अंतर ठेवून पेरणी करावी.

३. टोकण पद्धत : भात बियाणे ३० द १५ सें.मी. किंवा २२.५ द २२.५ सें.मी. अंतरावर टोकण करावे.

### तण नियंत्रण

- पुर्नलागवड पध्दतीचा भात
- रोपवाटीका : रोपवाटीकेतील तण नियंत्रणासाठी १५ मि.ली. ऑक्झीफ्लुरोफेन २३.५ टक्के ई.सी. प्रती १० लिटर पाण्यात पेरणीनंतर दोन ते तीन दिवसात फवारावे अथवा ब्युटाक्लोर ५० ई.सी. १.५ किलो क्रियाशील घटक प्रती हेक्टरी अथवा ॲनिलोगोर्ड ३० ई.सी. ३ किलो क्रियाशील घटक प्रति हेक्टरी फवारण्यात यावे.
- पेरभात व टोकण पद्धतीचा भात : पेरभात व टोकण पद्धतीच्या भात शेतीमध्ये पेरणीनंतरची कुळवणीमुळे तण नियंत्रण होते परंतु, रासायनिक पद्धतीने तणनियंत्रण करण्यासाठी तण उगवणीपूर्वी पेरणीनंतर लगेचच ६४० मि.ली. ऑक्झीफ्लुरोफेन २३.५ टक्के ई.सी. ०.१५० किलो क्रियाशील घटक प्रति हेक्टरी दोन ते तीन दिवसांत फवारावे व त्यानंतर तण उगवल्यानंतर २५ दिवसांच्या आत २० ग्रॅम मेटसल्फुरॉन मिथाईल १० टक्के + क्लोरीम्युरॉन इथाईल १० टक्के तयार मिश्रण ०.००४ किलो क्रियाशील घटक प्रति हेक्टरी ५०० लिटर पाण्यात मिसळून फवारावे अथवा पेंडॅमिथीलीन ३० टक्के ई.सी. ०.७५ क्रियाशील घटक प्रति हेक्टरी दोन ते तीन दिवसांत फवारावे व त्यानंतर तण उगवल्यानंतर २५ दिवसांच्या आत २-४-डी ०.५ किलो क्रियाशील घटक प्रति हेक्टरी ५०० लिटर पाण्यात मिसळून फवारावे व ४० दिवसांनी एक बेनणी करावी. अथवा १५०० मिली प्रेटीलाक्लोर ३०.७% इ.सी. प्रति हेक्टरी आणि पेरणी नंतर २५ दिवसांनी ७० ग्रॅम ॲझीमसल्फ्युरॉन ५०% डी.एफ. प्रति हेक्टरी ५०० लीटर पाण्यातून मिसळून फवारणी करावी.

### पीक संरक्षण

- रोपवाटिकेत वाफ्यात बियाणे टाकतेवेळी किंवा पेरणीनंतर १५ दिवसांनी दाणेदार क्लोरोपायरीफॉस १० टक्के (१० कि.ग्रॅ.) किंवा क्विनालफॉस ५ टक्के (१५ कि.ग्रॅ.)प्रति हेक्टर या प्रमाणात जमिनीत मिसळावे.
- रोपवाटिकेतील वाफ्यात खोडकिडीचे कामगंध सापळे प्रति हेक्टरी पाच या प्रमाणात लावावेत.
- रोपवाटिकेत तुडतुडे, खोडकिडी, गादमाशी यांचे प्रादुर्भावानुसार ५ टक्के निंबोळी अर्काची फवारणी करावी.
- खेकड्यांच्या बिळाशेजारी विषारी अमिष ठेवून खेकड्यांचे नियंत्रण करता येते यासाठी एसिफेट ७५ टक्के पाण्यात मिसळणारी भुकटी (७५ ग्रॅम) घेऊन १ कि.ग्रॅ. शिजवलेल्या भातामध्ये मिसळावे. या अमिषाचे १०० लहान-लहान गोळे करून खेकड्यांच्या बिळात टाकावेत.

### नाचणी

- रोपवाटीका : गादीवाफा साधारणतः १ ते १.५ मी. रुंद आणि ८ ते १० सें.मी. उंच व उतारानुसार लांबी ठेवून गादीवाफे जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात तयार करावेत. दर चौ.मी. क्षेत्रावर ३ किलो याप्रमाणे शेणखताचा थर द्यावा. आणि प्रति गुंठ्यास १ किलो युरिया द्यावा. ७ ते ८ सें.मी. अंतरावर ओळीत १ ते २ सें.मी. खोल बियाणे पेरून हाताने झाकावे. पेरणीनंतर १५ दिवसांनी प्रति गुंठा १ किलो युरिया द्यावा. एक एकर क्षेत्र रोप पुनर्लागणीकरीता २- ३ गुंठे क्षेत्रावरील रोपवाटीका पुरेशी होते.
- सुधारीत वाण : फुले नाचणी, दापोली-१, दापोली सफेद, दापोली-२, फुले कासारी

वर्ष :५३, अंक क्रं. : ५३, मे, २०२५ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## बाजरी

- शिफारशीप्रमाणे रासायनिक खताची मात्रा देऊन तसेच जीवाणु संवर्धकाची बीज प्रक्रिया करून पिकाच्या अंतरानुसार पेरणी करावी. ॲट्राझीन तणनाशकाची १.० कि.प्रती हेक्टरी पेरणीनंतर ५०० लि. पाण्यात मिसळून फवारणी करावी. पेरणी नंतर १० दिवसांनी व २० दिवसांनी विरळणी करावी.

## सोयाबीन

- पेरणीच्या वेळी : बिजप्रक्रिया करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. प्रती १० कि बियाणासाठी थायरम ३७.५% + कार्बोक्सिन ३७.५% ३० ग्रॅम बियाणास चोळावे. त्यानंतर प्रती १० कि बियाणासाठी थायमिथोक्जाम ३० एफ एस ६० मिली आणि शेवटी २५० ग्रॅम रायझोबियम व २५० ग्रॅम पी एस बी बियाणास चोळावे. यामुळे मातीतून आणि बियाणाद्वारे प्रसारीत होणाऱ्या रोगांपासून संरक्षण होते आणि पिवळा मोझॅक रोगाचा प्रसार थांबतो तसेच खोडमाशी व रसशोषक किडींपासून संरक्षण होते. शिवाय, पिकास नत्र व स्फूरदची उपदब्धता होते.
- पेरणीनंतर १५ ते २० दिवस या कालावधित :
  अ) तणनियंत्रणासाठी शिफारस केलेल्या तणनाशकाचा वापर करावा.
  इ) खोडमाशीच्या नियंत्रणासाठी बिजप्रक्रिया केली नसल्यास क्लोरॅन्ट्रानिलीप्रोल १८.५%ऽ२० मिली प्रती १० ली पाण्यातून फवारावे. शिवाय, या फवारणीमुळे खाणाऱ्या अळ्यांपासून संरक्षण होते.

## रब्बी ज्वारी

- कुळवाच्या सहाय्याने २ ते ३ पाळ्या द्याव्यात, तिसऱ्या पाळीपूर्वी ७ ते १० टन शेणखत पसरावे.

## फळबाग व्यवस्थापन

- डाळिंब –पावसाचे अतिरिक्त पाणी काढुन द्यावे. पिकसंरक्षणार्थ फळे पोखरणारी अळी, रस शोषणाऱ्या किडी व पानावरील ठिपके नियंत्रण करावे.
- सिताफळ – मशागतीची कामे करावीत.
- बोर – शिफारशीत खताच्या मात्रा द्याव्यात. नवीन फुटीवर पाने खाणारी अळी/ भुंगेरेचे नियंत्रण करावे.
- आवळा – सरंक्षित पाणी द्यावे. पाने खाणारी अळी, फुलकिडे यांचे नियंत्रण करावे.
- जांभूळ– पक्व फळांची काढणी करावी.
- कागदी लिंबू – शिफारशीत खतमात्रा (६००:३००:६०० ग्रॅम नत्रःस्फुरदःपालाश प्रति झाड प्रति वर्ष) + १५ किलो शेणखत + १५ किलो निंबोळी पेंड द्यावी. त्यापैकी ४०% नत्र व संपूर्ण स्फुरद, पालाश, शेणखत व निंबोळी पेंड द्यावी. हस्त बहाराच्या नियोजनासाठी जिब्रेलिक ॲसिड ५० पी पी एम ची फवारणी करावी.
- रसशोषक किडी : थायामेकोक्झाम २५% डब्लूजी. १ ग्रॅम/१० लि. पाणी किंवा क्लोरोपायरीफॉस २० टक्के २० मिली / १० लि. पाण्यातून फवारावे.
- कोळी : डायकोफॉल २०–२५ मिली/१० लि. पाण्यातून फवारावे. खैऱ्या रोगाच्या नियंत्रणासाठी लिंबू बागेमध्ये झाडावरील वाळलेल्या फांद्या काढून कापलेल्या जागेवर बोर्डोपेस्ट लावावी. डिंक्या, मुळकज
- रोग नियंत्रण – डिंक्या, मुळकज रोग नियंत्रणासाठी सायमॉक्झानिल + मॅन्कोझेक २ ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणात १५ लिटर प्रति झाड द्रावणाची आळवणी करावी.
- आंबा – पावसाळ्यात पूर्ण वाढ झालेल्या आंब्यास दरवर्षी ५० कि. शेणखत +१५०० ग्रॅम नत्र + ५०० ग्रॅम स्फुरद + ५०० ग्रॅम पालाश द्यावे. पैकी नत्राचा हप्ता जुलै व सप्टेंबर मध्ये दोन समान हप्त्यात विभागून द्यावा. तर स्फुरद व पालाश जुलैमध्ये एकाच हप्त्यात द्यावे.
- पेरु – पावसाळ्यात पूर्ण वाढ झालेल्या झाडास दरवर्षी ४–५ घमेली शेणखत, ९०० ग्रॅम नत्र, ३०० ग्रॅम स्फुरद, व ३०० ग्रॅम पालाश पैकी निम्मे नत्र बहाराच्या वेळी व उरलेला नत्र फळधारणेनंतर द्यावा, तर स्फुरद व पालाश एकाच हप्त्यात बहाराच्या वेळी द्यावा.

वर्ष :५३, अंक क्रं. : ५३, मे, २०२५ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## भाजीपाला व्यवस्थापन

- उन्हाळी हंगामातील वेलवर्गीय भाजीपाला पिकांची वेळेवर काढणी करावी.
- उन्हाळी हंगामातील वांगी, टोमॅटो, मिरची पिकाची तोडणी करावी.
- कीड व रोग नियंत्रणाचे उपाय करावे.
- खरीप हंगामातील भाजीपाला पीक लागवडीसाठी शेताची मशागत करावी.
- मशागतीचे वेळी शेणखताचा वापर करावा.
- खरीप हंगामात कांदा, वांगी, टोमॅटो, मिरची, भेंडी, गवार, वेलवर्गीय भाजीपाला, फ्लॉवर, कोबी इ. पिकांची लागवड करावी.
- कांदा, वांगी, मिरची, टोमॅटो, फ्लॉवर व कोबी पिकांच्या रोपवाटीकेसाठी रान तयार करावे. रोपे गादीवाफ्यावर तयार करावेत.
- कांदा, वांगी, मिरची, टोमॅटो, फ्लॉवर व कोबीचे रोप तयार करण्यासाठी बियांची पेरणी करावी.
- पेरणीआधी बिजप्रक्रिया करावी.
- रोपवाटीकेस सुरूवातीला झारीने पाणी द्यावे, नंतर पाटपाणी दिले तरी चालू शकते.
- निरोगी रोपांसाठी रोपवाटीका स्वच्छ ठेवावी. रोपांना रस शोषणाऱ्या किडींपासून संरक्षण करण्यासाठी गादीवाफ्यावर ३०० मेश जाळीचा मच्छरदाणीच्या कापडाचा वापर करावा.
- रोग व किडीपासून संरक्षण करण्यासाठी उपाय करावेत.
- मिरची, टोमॅटो, वांगी, फ्लॉवर व कोबी पिकांचे रोपे प्लॅस्टीक ट्रे मध्ये सुध्दा तयार करता येतात.

## आले

- १२० किलो नत्र प्रति हेक्टर यापैकी पहिला हप्ता ६० किलो नत्र लागवडीनंतर एक महिन्यांनी द्यावे.
- जमिनीच्या मगदूराप्रमाणे पाण्याचे नियोजन करावे.
- तणनाशकांचा वापर केला नसल्यास वेळच्या वेळी येणारी तणे खुरपणी करुन काढून टाकावीत.
- पाने पिवळी पडल्यास फुले सुक्ष्मग्रेड खख ची १०० मिली लि. पाण्यातून २ वेळा १५ दिवसांच्या अंतराने फवारणी करावी.
- जमिनीच्या मगदूराप्रमाणे पाण्याचे नियोजन करावे.
- पावसाचे पाणी साचू देवू नये. पाण्याचा तात्काळ निचरा करावा.

## पशुसंवर्धन

- पावसाळयापुर्वी गोठा दुरुस्त करावा. छताची छिद्रे बंद करावीत. गोठया भोवती पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. गोठयात ओलसरपणा राहणार नाही याची दक्षता घ्यावी.
- गोठे स्वच्छ व कोरडे ठेवावेत. चिखल होवू देवू नये.
- हिरव्या चाऱ्याकरीता ज्वारी, बाजरी, मका यासारखे पिकांना प्राधान्य द्यावे. याचबरोबर बहुवार्षिक पिकांमध्ये संकरीत नेपिअर, लसुणघास यासारखी पिके घ्यावीत.
- साठविलेल्या सुक्या चाऱ्यावर पाणी पडून त्यात बुरशी लागली असेल तर असा चारा जनावरांना देऊ नये तो नष्ट करावा.
- जनावरांचे खाद्य / खाद्यघटक दमट आर्द्रतायुक्त वातावरणात साठवू नयेत. त्यामध्ये भिंतीचा / जमिनीचा ओलसरपणा मुरणार नाही याची काळजी घ्यावी.

## अधिक उत्पादन देणारे चारा पिकांचे सुधारीत वाण

- **ज्वारी** : रुचिरा, मालदांडी ३५-१, फुले अमृता, फुले गोधन
- **बाजरी** : जायंट बाजरा, बायफ बाजरा
- **संकरीत नेपिअर** : फुले जयवंत, फुले गुणवंत
- **मका** : अफ्रिकन टॉल, मांजरी कम्पोझीट, विजय, गंगा सफेद २
- **ओट** : केन्ट, फुले हरीता, फुले सुरभी
- **चवळी** : श्वेता, ईसी४२१६, बंदेल लोंबिया, युपीसी ५२८६

- **लसूण घास** : आर एल ८८
- **बरसीम** : वरदान, मेस्कावी
- **स्टायलो** : फुले क्रांती
- **मारवेल** : फुले मारवेल ६–४०, फुले मारवेल १, फुले गोवर्धन

**प्रकाशक** : **डॉ. गोरक्ष ससाणे**
संचालक, विस्तार शिक्षण

**प्रमुख संपादक** : **डॉ. सचिन सदाफळ**
प्रभारी अधिकारी, प्रसारण केंद्र

**सहसंपादक** : **श्री. सुनिल राजमाने**
कनिष्ठ संशोधन सहाय्यक, प्रसारण केंद्र

**डिझाईनर** : **श्री. प्रदिप कोळपकर**
कलाकार तथा छायाचित्रकार, प्रसारण केंद्र
**श्री. सिध्दार्थ साळवे**
लिपीक–नि–टंकलेखक, प्रसारण केंद्र

**मफुकृवि विस्तार प्रकाशन क्र. २७८६/२०२५**